**प्रेसनोट दिनांक ०७/०४/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे**

**लोहगांव येथील बेकायदेशिर दारु विक्री करणा-या अर्पिता हॉटेलवर विमानतळ पोलीसांनी छापा टाकुन त्याचे मालक शरद सुरेख खांदवे यांना अटक करुन उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत.**

दिनांक ०६/०४/२०१९ रोजी विमानतळ पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री पिंगळे व त्यांचेकडील स्टाफ संजय आढारी, विष्णु गोणे, प्रशांत कापुरे, पुषेद्र चव्हाण असे लोहगांव भागामध्ये पेट्रोलिग करीत असताना पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांना त्यांचे बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, अर्पिता हॉटेल लोहगांव वाघोली रोड,पुणे येथे एक इसम हॉटेल मध्ये येणारे गि-हाईकांना विनापरवाना दारु विक्री करीत आहे,अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांनी सदर हॉटेलचे आडयोशाला थांबुन खात्री केली असता हॉटेलमध्ये एक इसम हॉटेल मध्ये आलेल्या गि-हाईकांना विदेशी बनावटीचे दारुची विक्री करीत असतांना दिसल्याने त्यांनी वरील स्टाफचे मदतीने पंचासमक्ष सदरचे हॉटेलवर रात्रौ २३/१५ वाजता छापा टाकुन तेथे दारु विक्री करणारे हॉटेल चालक इसम नामे शरद सुरेख खांदवे वय ३९ वर्षे रा. माथेआळी लोहगांव पुणे यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जात असलेला किंमत रुपये १५४०/- चा प्रोव्हिबिशनचा माल ( विदेशी दारुच्या बाटल्या) पंचासमक्ष जप्त करुन पोलीस नाईक २२६९ संजय आढारी यांनी त्याचेविरुध्द फिर्यादी दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर १६९/२०१९ महाराष्ट्र दारुबंधी अधिनियम कायदा कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री पिंगळे करीत असुन त्यांनी व त्यांचे वरील नमुद कर्मचारी यांनी सदरची कार्यवाही करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र पाटील)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर